जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -४८१ दिनांक - १५/११/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर

## खंडणी व सावकारीच्या गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपीस केले जेरबंद

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथकाकडील अंमलदार हे वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीत कोंबिंग ऑपरेशन व गुन्हे प्रतिबंधक चे अनुषंगाने गस्त करीत असताना गस्ती दरम्यान **पोलीस अंमलदार रविंद्र लोखंडे** यांना त्यांचे गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, खडक पोलीस स्टेशन, गुन्हा रजि नं २४०/२०२४, भा. न्या.सं. कलम ३०८ (३)(४) सह महाराष्ट्र सावकारी अधि नियम कलम ३९,४५ मधील निष्पन्न पाहिजे आरोपी नामे नविद मुक्तार शेख, रा. कासेवाडी, भवानी पेठ, पुणे हा त्याचे रहाते घराजवळ असलेले आयशा जनरल स्टोअर्स, कासेवाडी, भवानी पेठ, पुणे येथे येणार असलेबाबतची खात्रीशीर बातमी प्राप्त झाल्याने सदरची बातमी वपोनि, नंदकुमार बिडवई यांना कळविली असता त्यांनी सदर ठिकाणी स्टाफला रवाना करुन नमुद पाहिजे आरोपी मिळुन येताच त्यास ताब्यात घेवुन कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले.

प्राप्त बातमीचे अनुषंगाने स्टाफने आयशा जनरल स्टोअर्स, कासेवाडी, भवानी पेठ, पुणे येथे जावुन पाहिजे आरोपी याचा शोध घेतला असता तो सदर ठिकाणी मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव,पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **नविद मुक्तार शेख, वय- ३३ वर्षे, रा. ७८/बी, कासेवाडी, १० नं कॉलनी, भवानी पेठ, पुणे** असे सांगितले. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाकडे वरील दाखल गुन्ह्याबाबत अधिक चौकशी करता तो दाखल गुन्ह्यामध्ये निष्पन्न असल्याचे कबुली दिल्याने त्यास पुढील कारवाईकरीता खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. रंजनकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर,श्री. शैलेश बलकवडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),श्री निखिल पिंगळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.गणेश इंगळे, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १,दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार बिडवई, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे, पोलीस उप निरीक्षक, शाहीद शेख, पोलीस अंमलदार दत्तात्रय पवार, गणेश ढगे, बाळु गायकवाड, प्रदीप राठोड, धनंजय ताजणे, अजित शिंदे, इरफान पठाण, मनिषा पुकाळे, पोलीस नाईक रविंद्र लोखंडे, श्रीकांत दगडे,महेश पाटील,साईकुमार कारके, शिवाजी सातपुते, अमित गद्रे, अक्षय गायकवाड यांनी केली आहे.


Levi's